**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई -५१.

जा.क्र.एमएच/मु.अ.१/का.अ.१/प्रा./ ET-423 /२० दिनांक : 05 / 11 / 2020

**परिपत्रक**

**विषय:** कंत्राटदार नोंदणीचे सुधारित नियम सेवानिवृत्त स्थापत्य अभियंता यांना कंत्राटदार नोंदणीसाठी अनुभवाचे प्रमाणपत्र यंत्रसामुग्री याबाबत सुधारित नियम

**संदर्भ:**१.सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. सी ए टी ०८/०८/प्र.क्र.१३९/इमारती-२ दिनांक ०५/१२/२००८

२.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ०८/२०१५/प्र.क्र. १५१/इमा-२ दिनांक २१/११/२०१५

३.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.१२१/इमारती -२ दिनांक०५/०१/२०१९

४. मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.यांची २९/१०/२०२० रोजीची मान्यता

---

शासकीय / निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दि.०५/१२/२००८ रोजीचा शासन निर्णय व दि.२१/११/२०१५ रोजीचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहेत. त्यात नमूद सुधारणांनुसार म्हाडातील कंत्राटदार नोंदणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग महाराट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.१२१/इमारती-२, दिनांक ०५/०१/२०१९ अन्वये यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमीत करुन शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या व्यक्तींच्या तांत्रिक ज्ञानाचा अनुभवाचा फायदा शासकीय कार्य करतांना व्हावा या हेतूने आताच्या परिस्थितीत त्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी देण्यासाठी सुधारित सुचना निर्गमित केल्या आहेत.त्याअनुषंगाने शासकीय/ निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार नोंदणीसाठी खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

C:\Users\acer\Desktop\Implementation GR 28 Nov 18_responsibility_26.10.2020.docx

Scanned with CamScanner

१) कार्यकारी अभियंता पदापेक्षा निम्न पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु.९० लक्ष रकमेसाठी व विद्युत अभियंत्यांना रु.१० लक्ष साठी नोंदणी देण्यात यावी.

२) कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा उच्च पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु.१५० लक्ष रकमेसाठी व विद्युत अभियंत्यांना रु.२५ लक्षसाठी नोंदणी देण्यात यावी.

३) सेवानिवृत्त अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी करतांना त्यांना शासनाकडून /सक्षम प्राधिका-याकडून ना देय/ना चौकशी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४) इच्छुक अभियंता यांना पतधारी प्रमाणपत्र (solvency certificate), सुरक्षा ठेव अनामत रक्कम (security deposit), इसारा रक्कम (Earnest Money) इत्यादी बाबतचे नियम अन्य ठेकेदारांप्रमाणेच राहतील. तथापि निवत्त अभियंता यांना नोंदणीवेळी वार्षिक उलाढाल तसेच हातातील कामे (work in Hand) यामधुन सूट देण्यात येत आहे.

५) शासकीय कर्मचा-याने सेवानिवृत्तीच्या शेवटच्या वर्षभरात ज्या विभागात काम केलेले आहे त्या विभागात सेवानिवृत्तीनंतर एक वर्षाच्या कालावधीसाठी निविदा भरता येणार नाही.

६) कार्यकारी अभियंता पदापेक्षा निम्न पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या नोंदणीकृत स्थापत्य अभियंत्यांना व विद्युत अभियंत्यांना शासकीय सेवेतील अनुभवाच्या आधारे अनुक्रमे रु.३०० लाख व रु.५० लक्ष रक्कमेची कामे अथवा ३ वर्षे यापैकी जे लवकर असेल तोपर्यंत प्रत्यक्ष काम केल्याच्या अनुभवाच्या दाखल्याची निविदा प्रक्रियेत आवश्यकता नाही. तसेच आवश्यक यंत्रसामुग्री बाबत देखील उपरोक्त कालावधीत शिथीलता देण्यात येत आहे.

C:\Users\user\Desktop\Implementation GR 28 Nov 18_responsibility_26.10.2020.docx

Scanned with CamScanner

७) कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा उच्च पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना व विद्युत अभियंत्यांना अनुक्रमे रु.५०० लक्ष व रु.१०० लक्ष रक्कमेची कामे अथवा ३ वर्षे यापैकी जे लवकर असेल तोपर्यंत प्रत्यक्ष काम केल्याच्या अनुभवाच्या दाखल्याची निविदा प्रक्रियेत आवश्यकता नाही. तसेच आवश्यक यंत्रसामुग्री बाबत देखील उपरोक्त कालावधीत शिथीलता देण्यात येत आहे.

८) निवृत्त अभियंता यांना सदरील सूट ही सेवानिवृत्तीनंतर/राजीनाम्यानंतर ५ वर्षाच्या आत अर्ज केल्यास मिळू शकेल.

सदर परिपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी ध्यावी. सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल.

३/११/२०

मा.उपाध्यक्ष प्राधिकरण यांचे मान्यतेने

मुख्य अभियंता-१
प्राधिकरण

**प्रति,**

- मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण.
- मुख्य अभियंता - २,३/ प्राधिकरण.
- वित्त नियंत्रक / प्राधिकरण.
- सचिव / प्राधिकरण.
- मुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना माहितीस्तव व सर्व संबधित अधिकारी /कर्मचारी यांच्या निर्दशनास सदर बाब आणून देण्याकरीता अग्रेषित.

C:\Users\...\Desktop\Implementation GR 28 Nov 18_responsibility_26.10.2020.docx

Scanned with CamScanner

- मुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ यांना माहितीस्तव व सर्व संबधित अधिकारी /कर्मचारी यांच्या निर्दशनास सदर बाब आणून देण्याकरीता अग्रेषित.
- मुख्य अधिकारी
  मुंबई झोपडपटटी सुधार मंडळ / औरंगाबाद मंडळ / अमरावती मंडळ /नाशिक मंडळ/ नागपूर मंडळ / पुणे मंडळ / कोकण मंडळ / यांना माहितीस्तव व सर्व संबधित अधिकारी /कर्मचारी यांच्या निर्दशनास सदर बाब आणून देण्याकरीता अग्रेषित.
- उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
- मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण..
- निवासी लेखापरिक्षक/म्हाडा.
- मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचे स्विय सहाय्यक.

**माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

- उपमुख्य अभियंता - दक्षता व गुण नियंत्रक कक्ष/प्रा. , पी.एम.ए.वाय. कक्ष/प्रा. , पी.पी.डी./मुंबई मंडळ , पश्चिम/मुंबई मंडळ , पुर्व/मुंबई मंडळ , मुं.झो.सु. मंडळ , कोंकण मंडळ , पुणे मंडळ , नाशिक मंडळ , नागपूर मंडळ , औरंगाबाद मंडळ , अमरावती मंडळ, बीडीडी /मुंबई मंडळ
- उपमुख्य अभियंता - परिमंडळ - १,२,३,४ मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ.
- मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी / प्राधिकरण.
- कार्यकारी अभियंता - १,२,३/प्राधिकरण.



Scanned with CamScanner